पिंपरी चिंचवड महानगरपालिका
वैद्यकीय विभाग, मुख्य कार्यालय
पिंपरी, पुणे ४११ ०१८

## पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या विविध रुग्णालयांमध्ये तात्पुरत्या स्वरुपात दरमहा एकत्रित मानधनावर पदे भरणेबाबत

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वैद्यकीय विभागांतर्गत कोरोना विषाणूच्या संसर्गामुळे उद्भवलेल्या कोवीड१९ आजाराच्या पार्श्वभूमीवर विविध रुग्णालयांमध्ये दरमहा एकत्रित मानधनावर खालील तक्त्यात नमूद केलेली पदे हंगामी स्वरुपात ६ महिने कालावधीकरिता भरावयाची आहेत. सदर पदांचे पदनाम, पदसंख्या, शैक्षणिक अर्हता, तपशील व अटी - शर्ती खालीलप्रमाणे:

| अ.क्र. | पदनाम | शैक्षणिक अर्हता | पदसंख्या |
|---|---|---|---|
| १ | वैद्यकिय अधिकारी (कोवीड१९ आयुष प्रमाणपत्रधारक) | १) मान्यता प्राप्त विद्यापीठाकडील B.H.M.S. / B.U.M.S. पदवी उत्तीर्ण असणे आवश्यक.<br>२) संबंधित महाराष्ट्र कौन्सिल कडील अद्यावत नोंदणी बंधनकारक<br>३) संबंधित महाराष्ट्र कौन्सिल कडील कोवीड१९ आयुष प्रमाणपत्र धारण करणे आवश्यक | ९० |
| २ | दंतशल्य चिकित्सक | १) मान्यता प्राप्त विद्यापीठाकडील B.D.S. ही पदवी उत्तीर्ण असणे आवश्यक<br>२) महाराष्ट्र स्टेट डेंटल कौन्सिल यांचेकडील नोंदणी बंधनकारक | ४० |

उपरोक्त तक्त्यात नमूद केलेल्या तज्ञ वैद्यकीय अधिकारी, वैद्यकीय अधिकारी व इतर तांत्रिक संवर्गातील पदांना शैक्षणिक अर्हता व त्यांचा अनुभव विचारात घेऊन खालील प्रमाणे मानधन अदा करण्यात येईल:

| शैक्षणिक अर्हता | मानधन |
|---|---|
| बीएचएमएस / बीयूएमएस | दरमहा र.रु. ३५,०००/- |
| दंतशल्य चिकित्सक | दरमहा र.रु. ४०,०००/- |

टिप-

१. वरीलप्रमाणे जाहिरातीच्या अनुषंगाने कोरोना विषाणूचे पार्श्वभूमीवर उमेदवारांनी महापालिकेमध्ये समक्ष येण्याची आवश्यकता नाही.

२. सद्यपरिस्थिती लक्षात घेता संपुर्ण राज्यामध्ये लॉकडाऊनची परिस्थिती असून प्रवासाची कोणतीही साधने उपलब्ध नाहीत. त्यामुळे वरीलप्रमाणे नमुद पदांकरीता स्थानिक उमेदवारांचा प्राधान्याने विचार करण्यात येईल.

३. वरीलप्रमाणे नमूद पदे ई-मेलद्वारे प्रथम प्राप्त होणाऱ्या अर्जाचे उमेदवारास प्रथम प्राधान्य या तत्वावर भरण्यात येणार आहेत. त्यानुसार प्राप्त होणाऱ्या अर्जांची प्रतिक्षासूची तयार करुन आवश्यकतेनुसार उमेदवारांना नियुक्त्या देण्यात येणार आहेत.

४. याकरीता उमेदवारांनी सोबत नमूद केलेली माहिती तयार करुन महापालिकेच्या recruitment.medho@pcmcindia.gov.in या ई-मेल वर आवश्यक ती कागदपत्रे स्कॅन करुन पी.डी.एफ. स्वरुपात पाठवावी. सदरचा अर्ज व कागदपत्रांची आवश्यक ती छाननी करुन पात्र उमेदवारांचे आदेश निर्गत करण्याची कार्यवाही वैद्यकिय विभागामार्फत केली जाईल.

E:\ABIJ\Corona\Recruitment\Advt.docx

Scanned with CamScanner

५. प्रस्तुतच्या नियुक्त्यांमधील काही पदे ही CCC, DCHC, DCH येथील आहेत. अर्ज करणाऱ्या उमेदवारांना या ठिकाणी देखील आवश्यकतेनुसार कामकाज करावे लागेल. त्यानुसार कोवीड१९ चे प्रत्यक्ष काम देखील करणे बंधनकारक राहिल.

६. निर्गत केलेले आदेश निर्गत केलेनंतर उमेदवारांना ई-मेलद्वारे पाठविले जातील. तदनंतर उमेदवारांनी तातडीने रुजू होणे बंधनकारक असेल. रुजू होतेवेळी उमेदवाराने कागदपत्रांच्या साक्षांकित प्रती कार्यालयाकडे दाखल करणे बंधनकारक राहिल.

७. ई-मेलद्वारे सादर केलेल्या प्रती व प्रत्यक्ष रुजू होताना सादर करावयाच्या प्रतींमध्ये तफावत आढळल्यास उमेदवारास रुजू करुन घेतले जाणार नाही, तसेच नेमणूकीच्या कोणत्याही टप्प्यावर सेवा संपुष्टात आणणेत येईल याची स्पष्टपणे नोंद घ्यावी.

८. नियुक्ती देण्यात आलेल्या वैद्यकिय अधिकारी व दंतशल्य चिकित्सक यांना कोवीड१९ आपत्कालीन परिस्थितीचे अनुषंगाने महापालिका निश्चित करेल अशा कोणत्याही रुग्णालयामध्ये रुग्णसेवा देणे बंधनकारक राहिल. याकरिता ते २४ तास महापालिका सेवेप्रती बांधील राहतील.

९. वैद्यकिय अधिकारी व दंतशल्य चिकित्सक यांना कोवीड१९ आपत्कालीन परिस्थितीचे अनुषंगाने महापालिका परिसरामध्ये शासनाचे निर्देशानुसार नागरिकांच्या सर्व्हेक्षणाचे कामकाज करणे बंधनकारक असेल.

१०. उमेदवारास कोणताही प्रवासखर्च देय असणार नाही अथवा त्यांना याबाबत कोणतेही सहाय्य करणेत येणार नाही.

११. प्रस्तुतच्या मानधनावर करावयाच्या नेमणुका ह्या पुर्णपणे तात्पुरत्या / हंगामी स्वरुपाच्या आहेत. त्यामुळे अर्जदारास मनपामधील कोणत्याही पदावर कायमस्वरुपी नेमणुकीचा हक्क सांगता येणार नाही. याबाबत विहित नमुन्यात हमीपत्र लिहुन द्यावे लागेल.

१२. ज्या दिवशी मनपास सदर पदांची आवश्यकता नसेल, त्यावेळी कोणत्याही नोटिशीशिवाय मानधनावरील सेवा संपुष्टात आणण्यात येतील.

१३. उपरोक्त पदांकरीता उमेदवाराने ई-मेलद्वारे करावयाचा अर्जाचा नमुना सोबत जोडणेत आलेला आहे.

१४. निवड केलेल्या उमेदवारांना महापालिकेने ठरवुन दिलेल्या अटी शर्तीनुसार कामकाज करणे बंधनकारक राहिल. तसेच महानगरपालिकेच्या रुग्णालयामध्ये आवश्यकतेनुसार ३ शिफ्टमध्ये कामकाज करावे लागेल.

१५. वय वर्षे ५० पूर्ण असणा-या उमेदवारांनी उपरोक्त नमूद पदांसाठी अर्ज करुन नयेत, असे अर्ज अपात्र समजण्यात येतील.

१६. सदर उमेदवारांना महानगरपालिकेच्या वैद्यकिय विभागांतर्गत असणाऱ्या दवाखाना / रुग्णालयामध्ये कामकाज करावे लागेल. तथापि, नेमून दिलेल्या दवाखाना / रुग्णालयामध्ये आवश्यकता नसलेस अन्य ठिकाणी नियुक्ती देण्यात येईल.

१७. सदरच्या नेमणूका कोणत्याही स्तरावर रद्द करण्याचे सर्व अधिकार महापालिका आयुक्त यांनी राखून ठेवलेले आहेत.

सही/-
(श्रावण हर्डीकर)
आयुक्त
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी, पुणे ४११ ०१८

वैद्यकिय मुख्य कार्यालय
क्र. वैद्य/३/कावि/ २८१ /२०२०
दि. ०४-०५-२०२०

अति. आरोग्य वैद्यकिय अधिकारी
पिंपरी–चिंचवड महानगरपालिका
पिंपरी–४११ ०१८.

E:\ABB\Corona\Recruitment\Advt.docx

Scanned with CamScanner

# <u>उमेदवाराने ई-मेलद्वारे सादर करावयाची माहिती</u>

विषय - . . . . . . . . . . . . . . . . . या पदासाठी अर्ज

नाव -
पत्ता -

मोबाईल क्रमांक -
ई-मेल आय.डी. -

जन्मदिनांक -

शैक्षणिक अर्हता -

अनुभव (असल्यास) -

---

ई-मेलद्वारे सादर करावयाची कागदपत्रे -

१. शैक्षणिक अर्हतेची कागदपत्रे
२. नोंदणी प्रमाणपत्र
३. नुतनीकरण प्रमाणपत्र
४. जन्मतारखेचा पुरावा
५. कोवीड१९ आयुष प्रमाणपत्र (वैद्यकिय अधिकारी पदाकरीता)
६. ओळखपत्र (आधारकार्ड, वाहनपरवाना, पॅनकार्ड इ. पैकी एक)

Scanned with CamScanner